दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
# रायगड नगरी
मुख्य संपादक : सुनिल पोतदार
● वर्ष १५ वे ● अंक ३५८ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● मंगळवार दि.२३ मार्च २०२१ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

## राज्यातील काही शहरांमध्ये लॉकडाऊन केला जाऊ शकतो : ना.राजेश टोपे

**दै.रायगड नगरी । मुंबई**

कोरोना रुग्णवाढ न थांबल्यास राज्यातील काही शहरांमध्ये लॉकडाऊन केला जाऊ शकतो, अशी शक्यता आरोग्यमंत्री राजेश टोपे यांनी व्यक्त केली आहे. लॉकडाऊन टाळायचा असेल तर नियम पाळावेच लागतील, असा इशाराही आरोग्यमंत्र्यांनी दिला आहे. राज्यात रोज कोरोना रुग्णसंख्येचा उच्चांक गाठला जात आहे. या पार्श्वभूमीवर आरोग्यमंत्री राजेश टोपे यांनी पत्रकारांशी संवाद साधला.

कोरोना बाधित रुग्णसंख्येचा राज्यात रोज विक्रमी आकडा समोर येत आहे. यात विशेषकरुन मुंबई, पुणे, नागपूरची आकडेवारी चिंताजनक असल्याचे आरोग्यमंत्री टोपे यांनी सांगितले. केंद्र सरकारने दिलेल्या मार्गदर्शक सूचनांचे पालन/अंमलबजावणी राज्यात होत असल्याचेही टोपे यांनी सांगितले. सध्या पुरेशा प्रमाणात बेड उपलब्ध आहेत. मात्र, वाढती संख्या लक्षात घेता आणखी तयारी करावी लागणार आहे.

# राज्यात अनेक शासकिय कार्यालय चक्क थाटलीत आजही भाडेतत्वावर...

**दै.रायगड नगरी । अरविंद पोतदार**

**पनवेल** : महाराष्ट्रात अनेक सरकारे आली व गेली व पुन्हा पुन्हा आली सत्तांतराच्या या राजकीय खेळात युती, आघाडी, महाविकास आघाडी आदींनी आप आपल्या परीने सर्वांनी राज्य केले. विविध लुप्त्या वापरून शासनाच्या तिजोरीत जनतेच्या कररूपी पैशातुन राज्यांचा विकास अधिक बचत करून कसा साधता येईल याकडे राज्यकर्ते यांचा धोरणात्मक विचार असतो, असे सर्वसामान्यांतून बोलले जात आहे.परंतु या विकासाच्या धोरणात शासकीय बचतीचा सरळ व सोपा जालीम उपाय आजपर्यंत अनेक राज्यकर्ते यांना का बरे सापडला नाही? की बारकाईने त्यांनी पाहिले नाही? की कानाडोळा करून आंधळ दळतय कुत्र पीठ खातय या उक्ती प्रमाणे खरोखरच दुर्लक्ष केलाय, असा प्रश्न आता विचारण्याची पाळी जनतेवर आली आहे.

राज्यात अनेक शासकीय कार्यालये ही आजही भरमसाट भाडेतत्वावर शासनाच्या तिजोरीवर अवलंबुन असल्याने हा जनतेचा पैसा विनाकारण व्यर्थ जात आहे. राज्यात विविध जिल्ह्यात अनेक ठिकाणी शासनाच्या जमीनी ओसाड पडलेल्या आहेत अथवा काही लाल फीतीत अडकुन पडल्या आहेत त्या कडे का बरे दुर्लक्ष होत आहे? असा संतप्त सवाल जनतेकडून आता विचारला जात आहे.

पनवेल तालुक्याचाच विचार केला तर सहाय्यक निबंधक कार्यालय हे कित्येक वर्षे मासीक ३,१०५ रूपयाच्या भाडेतत्वावर आहे. इतक्या वर्षांत भरलेल्या भाड्यात किमान शासनाच्या हक्काचा एखादा स्वमालकीचा एखाद्या सदनिकेत ३ बीएचएके प्लॅट घेता आला असता तर सहाय्यक निबंधक कार्यालय हे स्वतःच्या जागेत उभे राहिले असते व मासिक भाड्याची रक्कम अनेक वर्षे वाचलीही असती.

दुसरे उदाहरण द्यायचे म्हटले तर पनवेल तालुक्यातुन बक्कळ (स्टॅम्पड्युटी) रूपी महसुल शासनाला जेथुन रोज मिळतो ते सह दुय्यम निबंधक पनवेल कार्यालय क्रमांक एकचे भाडे ५६,२४७ तसेच पनवेल २, व ३ व ५ कार्यालयाचे मासीक भाडे ६,९०,००० आणि कार्यालय क्रमांक ४ चे भाडे ५४,५२८ असे आहे. ही कार्यालये आजही कित्येक वर्षे भाडेतत्वावरच अवलंबून असून जनतेच्या कररुपी पैशातून जमा झालेला शासनाच्या तिजोरीतील पैसा या कार्यालयाला भाडेरुपी देण्यात येत आहे. याबाबत आमच्या प्रतिनिधीने पनवेल तालुक्यातील ५ सब रजिस्टार कार्यालयाला मासिक भाडे किती आहे? याची भ्रमणध्वनीवरुन माहिती मागितली असता जिल्हा सहनिबंधक साटम यांनी सांगितले की, सदर माहिती ही आपण लेखी अर्ज केलात तरच मिळू शकते, अन्यथा देता येणार नाही, अशा स्वरुपाचे उत्तर त्यांनी का बरे दिले असावे? असा प्रश्न प्रतिनिधीला पडला. परंतु शोध पत्रकारिता घेतलेले आमचे प्रतिनिधी यांनी संबंधित कार्यालयाची सर्व माहिती मिळविली.

तिसरे उदहारण राज्य उत्पादन विभागाचे कार्यालयाचे भाडे २२,००० आहे तर त्यांच्याच अखत्यारीत येणारे राज्य उत्पादन शुल्क त्यांच्या भरारी पथकाच्या कार्यालय हे देखील १६,५०० रूपये मासीक भाडेतत्वावर आजही सुरू आहे.

प्रशासकिय मान्यता घेऊन निधीचा योग्य प्रकारे नियोजन केल्यास भाडेतत्वावर असणारी शासकिय कार्यालयेमुळे आजमितीला करोडो रूपये शासनाचे वाया गेले असतील याचा विचारही अनेक राज्यकर्ते करू शकले नाही ही खरोखरच खेदाची व लाजीरवाणी बाब असल्याचे नागरीकांत बोलले जात आहे. इतकी वर्षे उलटली या भाडेतत्वावर शासनाचा वाया गेलेल्या पैशाने राज्यात अनेक स्वतःच्या मालकीची शासकिय कार्यालये विविध ठिकाणी उभी राहीली असती व मोठ्या प्रमाणात शासनाच्या तिजोरीत भर पडली असती. जेणेकरून आजमितीला जनतेला जीवनावश्यक वस्तूंच्या गगनाला भिडलेल्या किंमतीचा सामना करावा लागत आहे. घरगुती गॅस, पेट्रोल, डाळी, अन्नधान्य, औषधे, अवाच्या सव्वा विजबिले, पाणी पट्टी, विविध भरमसाठ कर, वाहन कर, इन्कम टॅक्स, केंद्र व राज्य सरकारचा जी.एस.टी. असे विविध कररूपी महसुल शासनाच्या तिजोरीत सर्व सामान्य नागरीकांबरोबर व्यापारी वर्गाकडुन वसुल केला जात आहे. या महागाईच्या भडक्यात जनता अक्षरशा होरपळून निघाली असताना शासकिय कार्यालये मात्र भाडेतत्वावर आजही विविध राज्यात दिमाखात उभी असल्याची जनता बोलत आहे. यावर महाविकास आघाडी सरकारने तरी यावर गांभीर्याने विचार करून पनवेल प्रशासकीय भवन आजमितीला अनेक वर्षे होवूनही त्याचे उद्घाटन देखील झाले नाही.

तत्कालीन महसूलमंत्री बाळासाहेब थोरात यांनी याचे भूमीपूजन केले होते. आता उद्घाटन करून वरील अनेक कार्यालये तेथे आल्यास शासनाच्या तिजोरीवर पडणारा भाडेरुपी भार कमी करावा, अशी नागरिकांची मागणी आहे. तसेच महाराष्ट्र राज्यात जिल्ह्यात, तालुक्यात जी-जी शासकीय कार्यालये भाडेतत्वावर आहेत ती शासनाच्या जागेत कशी स्थलांतर करता येतील याचा नियोजनबद्ध आराखडा तयार करावा, जेणेकरून शासनाच्या तिजोरीत येणारा जनतेच्या कररुपी पैशाचा विनियोग हा विकास कामाला होवू शकेल, असे सर्वसामान्य नारिकांत बोलले जात आहे.

● सहाय्यक निबंधक कार्यालय हे कित्येक वर्षे मासीक ३,१०५ रूपयाच्या भाडेतत्वावर आहे.

● सह दुय्यम निबंधक पनवेल कार्यालय क्रमांक एकचे भाडे ५६,२४७ तसेच पनवेल २, व ३ व ५ कार्यालयचे मासीक भाडे ६,९०,००० आणि कार्यालय क्रमांक ४ चे भाडे ५४,५२८ असे आहे.

● राज्य उत्पादन विभागाचे कार्यालयाचे भाडे २२,००० आहे तर त्यांच्याच अखत्यारीत येणारे राज्य उत्पादन शुल्क त्यांच्या भरारी पथकाच्या कार्यालय हे देखील १६,५०० रूपये मासीक भाडेतत्वावर आजही सुरू आहे.

## संक्षिप्त...

### केंद्र सरकारच बरखास्त केले पाहिजे: संजय राऊत

**दै.रायगड नगरी । मुंबई**

महाराष्ट्रात राष्ट्रपती राजवट लावण्याऐवजी केंद्र सरकारच बरखास्त केलं पाहिजे. केंद्राकडून राज्याच्या स्वायत्ततेवर घाला घातला जातोय, अशी टीका शिव-सेनेचे खासदार संजय राऊत यांनी केली आहे. राऊत पत्रकारांशी बोलताना म्हणाले की, अनिल देशमुखांचं काय होणार, हा महाराष्ट्रापुढील किंवा देशासमोरील महत्व-ाचा प्रश्न नाही. मुंबईच्या माजी पोलिस आयुक्तांच्या खांद्यावर बंदुक ठेवून सरकारवर निशाणा साधला जातोय, असं ते म्हणाले. ते म्हणाले की, एकेकाळी परमबीर सिंह यांच्यावर शंका उपस्थित करणारे आज त्यांचा वापर करुन तोफा उडवत आहेत. परमबीर सिंह हे विरोधकांचं महत्वाचं शस्त्र आहे. केंद्रीय तपास यंत्रणांविषयी आमच्यात दुमत नाही. केंद्रीय तपास यंत्रणा महाराष्ट्रात घुसत आहेत हा महाराष्ट्रावर घाला आहे.

प्रकाश आंबेडकरांनी राष्ट्रपती लागू करण्याची मागणी केली याबाबत विचारलं असता ते म्हणाले की, प्रकाश आंबेडकर हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नातू आहेत. बाबासाहेब घटनाकार आहेत. त्यांच्याविषयी आमच्या मनात किती श्रद्धा आहे, हे नव्याने सांगण्याची गरज नाही. महाराष्ट्रात राष्ट्रपती राजवट लावावी असं प्रकाश आंबेडकर सांगत असतील, तर त्यांनी पुन्हा एकदा घटनेचा अभ्यास करणं गरजेचं आहे. कारण ज्या प्रकारे खोटी-नाटी प्रकरणं निर्माण करून विरोधी पक्ष महाराष्ट्र सरकारवर दबाव आणतंय किंवा एक केस बनतं. यामुळे राष्ट्रपती राजवट लागू शकतं नाही किंबहुना केंद्र सरकार बरखास्त केलं पाहिजे. कारण हा राज्याच्या स्वायत्तेवर घाला आहे, असं संजय राऊत म्हणाले.

## शिवभोजन चालकाने घाबरून जाण्याचे कारण नाही ३१ मार्च पूर्वी सर्व शासकीय कार्यालयातील अधिकारी पाडणार बोगस बिलांचा खच

**दै.रायगड नगरी । पनवेल**

सालाबाद प्रमाणे मार्च अखेर बोगस बिलांचा खच सर्व शासकीय कार्यालयात पडत असतात. त्यामुळे तुमच्या खऱ्या बिलाला विलंब होऊ शकतो. परंतु तुमची शिव भोजनाची बिले ३१ मार्च पूर्वी मागील बिले देण्याची जबाबदारी जिल्हाधिकाऱ्यांवर आहे. त्यामुळे ती बिले ३१ मार्च पूर्वी तुम्हाला मिळणार म्हणून काळजी करू नका प्रतिवर्षी ३१ मार्च पूर्वी जी शासनाला देणी आहेत ती पूर्ण करण्याची जबाबदारी संबंधित अधिकाऱ्यांवर असते.

त्यामुळे तुमची बिले तर मिळणार परंतु त्याबरोबर बोगस बिलांचा पाऊस ट्रेझरी मध्ये पडणार. यामध्ये जिल्हाधिकारी कार्यालय, सार्वजनिक बांधकाम खाते, कृषी खाते, जंगल खाते, सहाय्यक निबंधक खाते, सब रजिस्टर खाते, पोलीस खाते अशी महत्त्वाची खाती बोगस बिलाबाबत आघाडीवर असतात आणि त्यातून लाखोंची कमाई संबंधित अधिकारी व कर्मचारी हे तुम्ही आम्ही भाऊ सर्व मिळून खाऊ अशा पद्धतीने शासकीय पैशाचा (जनतेचा) पैशाचा अपहार करीत असतात. हे गेले कित्येक वर्ष घडत आहे.

त्यामुळे शिव भोजनाची चालकांची घामाच्या पैशाची बिले जरी ३१ मार्च पूर्वी मिळाली नाही तरी ३१ मार्चच्या शेवटच्या घटकेला मार्च अखेर पर्यंतची बिले देण्यास जिल्हा पुरवठा अधिकारी बांधील आहेत, हे लक्षात ठेवा आणि ती जर मिळाली नाहीत तर शिवभोजन चालक न्यायालयात न्याय मागू शकतात पण ही वेळ येणार नाही. कारण ३१ मार्चच्या शेवटच्या दिवशी आपल्या खात्यात मार्च अखेरपर्यंत सर्व बिले जमा झालेली असतील.

## आ.प्रशांत ठाकूर यांनी घेतला कोरोना लसीचा पहिला डोस

**दै.रायगड नगरी । पनवेल**

कोरोना काळात स्वतःपेक्षा जनतेची काळजी घेत त्यांना सर्वोत्तपरी व सढळ हस्ते मदत करणारे भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी आज (दि. २२ मार्च २०२१) पनवेल येथील महाराष्ट्र भूषण डॉ. नानासाहेब धर्माधिकारी उपजिल्हा रुग्णालयात कोविड - १९ अर्थात कोरोना लसीचा पहिला डोस घेतला.

यावेळी वैद्यकीय अधिक्षक डॉ. बसवराज लोहारे, आरोग्य अधिकारी श्री. गोसावी आदी उपस्थित होते. मागील वर्षात संपूर्ण जगात कोविड १९ अर्थात कोरोना या वैश्विक महामारीने थैमान घातले. या महामारीने संपूर्ण जगात परिस्थिती गंभीर केली. रोजंदारीवर जीवन असलेल्या अनेकांचे उदरनिर्वाहाचे साधन जाण्याबरोबरच दोन वेळचे अन्न मिळणे कठिण झाले होते. कोरोना व्हायरस आणि त्यामुळे आलेल्या लॉक डाऊन परिस्थितीत गरीब नागरिकांवर उपासमारीची वेळ येऊ नये यासाठी दानशूर नेते माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर



यांच्या मार्गदर्शनाखाली आमदार प्रशांत ठाकूर यांनी श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ पनवेल आणि भाजपच्यावतीने 'मोदी भोजन' कम्युनिटी किचन अर्थात मोफत अन्नछत्र उपलब्ध करून दिले आणि त्यामार्फत १ लाख ५० हजारहून नागरिकांना भोजन देण्यात आले. त्याचबरोबर १ लाख १० हजारहून अधिक नागरिकांना कोरडा अन्नधान्य देऊन कोरोनाच्या ..../२

## १५ हजाराची लाच स्वीकारताना म.रा.वि.वि. कंपनीच्या कार्यकारी अभियंत्यांना रंगेहाथ पकडले

**दै.रायगड नगरी । पनवेल**

वर्क कम्प्लिशन रिपोर्ट देण्यासाठी आरोपी लोकसेवक यांनी तक्रारदाराकडे १५ हजाराची लाच मागितली. याप्रकरणी सदर तक्रारदाराने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाला तक्रार केल्यानंतर आज सायंकाळी सापळा रचून सदर कार्यकारी अभियंत्यांला सदर लाच स्वीकारताना रंगेहाथ पकडण्यात आले आहे.

तक्रारदार नोकरी करीत असलेल्या श्री म्हाळसा एंटरप्रायझेस या कंपनीमार्फत नेरळ येथील बांधकामाच्या ठिकाणी ट्रान्सफार्मर बसविले. नंतर वर्क कम्प्लिशन रिपोर्ट देण्याकरिता आरोपी लोकसेवक कार्यकारी अभियंता म.रा.वि.वि.कंपनी लि. पनवेल ग्रामीण (वर्ग-१) चे शैलेशकुमार कांबळे (५२) यांनी १५ हजाराची लाच मागितली व सदर लाच स्वीकारताना आज त्यांना नवी मुंबई लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पोलीस उपअधिक्षक श्रीमती.ज्योती देशमुख यांच्या मार्गदर्शनाखली पो. हवा.पवार, पो.हवा.परदेशी, चापोहवा गायकवाड, पो.ना.फडतरे, पो. ना.ताम्हाणेकर आदींच्या पथकाने पकडले आहे.

## महाविकास आघाडीच्या वतीने महासभेत पीपीई किट घालून आंदोलन

### टॅक्स विरोधात महाविकासआघाडी नगरसेवकांचा महासभेत आक्रोश



**दै.रायगड नगरी । पनवेल**

मालमत्ता करासंदर्भात सत्ताधाऱ्यांनी आपली भूमिका स्पष्ट करावी तसेच ही करप्रणाली जाचक असून महापालिकेने नागरिकांवर लादू नये अशी जोरदार मागणी करत मालमत्ता कराच्या विरोधात महाविकास आघाडीच्या वतीने आंदोलन करत आक्रोश व्यक्त करण्यात आला. आज (दि.२२ मार्च) पनवेल महापालिकेची महासभा आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात ऑनलाईन पद्धतीने आयोजित करण्यात आली होती. यावेळी महाविकास आघाडीच्या नगरसेवकांनी महापालिकेच्या मालमत्ता करासंदर्भातील प्रस्तावाविरोधात आक्रोश व्यक्त करताना पीपीई किट घालून सभागृहात आंदोलन केले. महापौरांनी टॅक्स संदर्भात सत्ताधारी पक्षाची भूमिका स्पष्ट करावी अन्यथा आम्ही इथून बाहेर जाणार नाही असं म्हणत सत्ताधारी पक्षाच्या विरोधात आंदोलकांनी जोरदार घोषणाबाजी करत निषेध व्यक्त केला.

यावेळी महापालिकेचे विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे यांच्या नेतृत्वाखाली नगर-सेवक गणेश कडू, सतीश पाटील, विजय खानावकर, विष्णू जोशी, डॉ.सुरेखा मोहोकर, प्रीती जॉर्ज, गोपाळ भगत, सारिका भगत, उज्वला पाटील, प्रिया भोईर, प्रज्योती म्हात्रे, मंजुळा कातकरी, कमल कदम, अरुणा दाभणे, ज्ञानेश्वर पाटील आदी नगरसेवक या आंदोलनात सहभागी झाले होते.

महापालिकेने कोणत्याही प्रकारचा टॅक्स लावू नये ही आग्रही भूमिका यापू-र्वीही महाविकास आघाडीची होती आणि अजूनही हीच भूमिका ठाम असल्याचे यावेळी आंदोलकांनी सांगितले. पनवेल महानगरपालिका स्थापनेपासून पुढील पाच वर्षे कोणताही नवीन मालमत्ता कर लागू करू नये अशी मागणी यावेळी महाविकास आघाडीच्या नगरसेवकांनी यावेळी केली.

सत्ताधाऱ्यांनी आमच्या समोर येऊन सभागृहात मालमत्ता करासंदर्भात आपली भूमिका स्पष्टपणे मांडावी कारण सत्ताधारी 'मूह मे राम बगल मे छुरी' असल्याप्रमाणे नागरिकांची दिशाभूल करत आहेत असा आरोपही यावेळी करण्यात आला. कोरोनाच्या वाढत्या प्रादुर्भावामुळे शासनाने दिलेल्या आदेशानुसार पनवेल महापालिकेची महासभा ऑनलाईन पद्धतीने आयोजीत करण्यात आली होती. त्यामुळे शासनाच्या नियमाप्रमाणे ठराविक पदाधिकारी महासभेत सहभागी झाले होते. तसेच सर्व नगरसेवक व ..../२

ज्यावेळी महापालिका स्थापन झाली त्यावेळी पुढील पाच वर्षे नागरिकांवर कोणताही कर लावणार नाही असा निर्णय घेण्यात आला होता. त्यानंतर महासभेत मालमत्ता करासंदर्भात झालेल्या प्रस्तावाला ४६ सत्ताधारी नगरसेवकांनी मतदान करून पाठिंबा दिला मात्र आम्ही विरोधी पक्षातील २५ नगरसेवकांनी ठाम विरोध केला. या जाचक करप्रणालीविरोधात नागरिकांमध्ये आक्रोश निर्माण होत चालला आहे. ४ वर्षे उलटून गेली आणि तुम्ही मागील ४ वर्षांचा देखील टॅक्स मागताय म्हणजे यातून भाजप सत्ताधाऱ्यांचा हा दुटप्पीपणा दिसून येतोय. महापालिकेने कोणत्याही प्रकारचा कर नागरिकांवर लावू नये ही भूमिका पूर्वीपासून आमची आहे आणि यापुढेही अशीच कायम राहील.

**- प्रीतम म्हात्रे (विरोधी पक्षनेते पनवेल महापालिका)**

## श्रीवर्धन शहरात चोरट्यांचा पुन्हा एकदा धुमाकूळ ; एका रात्रीत सहा घरे फोडली

**दै.रायगड नगरी । संतोष चौकर**

**श्रीवर्धन** : श्रीवर्धन शहरात चोरट्यांनी पुन्हा एकदा धुमाकूळ घातला आहे. शनिवारच्या एकाच रात्रीत चोरट्यांनी तब्बल शहरामधील सहा घरे फोडली आहेत. त्यामुळे २०१७ सालच्या घरफोड्यांच्या पुन्हा एकदा आठवणी ताज्या झाल्या आहेत. २०१७ साली देखिल चोरट्यांनी अशाच प्रकारे घरफोड्यांचे सत्र श्रीवर्धन शहरात सुरू ठेवले होते. अनेक बंद घरे फोडून चोरट्यांनी काही मिळते का हे तपासण्याचा प्रयत्न केला होता. परंतु सुदैवाने सर्व बंद घर असणारे नागरिक मुंबईत राहत असल्याने त्यांनी आपल्या घरामध्ये फक्त कपडे अंथरूण-पांघरूण याच्या व्यतिरिक्त काहीही ठेवलेले नसल्याने चोरट्यांच्या हाताला काही लागले नव्हते. श्रीवर्धन शहर पर्यटनाच्या दृष्टीने सध्या खूप मोठ्या प्रमाणावरती भरभराटीला येत आहे. यासाठी राज्य सरकारने श्रीवर्धन शहरामध्ये नगरपरिषदेच्या माध्यमातून ७२ सीसीटीव्ही कॅमेरे बसवले होते. परंतु तीन जून रोजी आलेल्या निसर्ग चक्रीवादळामुळे श्रीवर्धन शहरातील बहुतांश सीसीटीव्ही कॅमेरे निकामी झाले आहेत. काही ठिकाणचे कॅमेरे जरी उभे असले तरी त्यांना जोडणाऱ्या वीज वाहिन्या तुटल्यामुळे कॅमेरे गेल्या अनेक दिवसांपासून बंद आहेत. याचाच गैरफायदा चोरट्यांनी उचलत श्रीवर्धन शहरातील तब्बल सहा बंद घरे फोडली आहेत. मात्र ही बंद घरे फोडताना चोरट्यांनी मुख्य दरवाजा तसेच घरातील इतर सर्व वस्तूंची ..../२

# होळीसाठी सावरीच्या हजारो झाडांची कत्तल थांबवा : प्रा.उदय मानकवळे

**दै.रायगड नगरी । देवा पेरवी/प्रदीप मोकल**

**पेण** : होळी हा सण अवगुणांची होळी करणारा सण आहे. त्रेतायुग, द्वापारयुग, सत्ययुगापासुन ते आता कलियुगापर्यंत हा सण मोठया आनंदाने साजरा केला जात आहे. पुराणामध्ये भक्त प्रल्हादापासून अनेक कथांचा परामर्श घेतल्यास होळी म्हणजे, काम, क्रोध, मद, मोह, मत्सर, दंभ या षड्रिपुंची अवगुणांची पेटविलेल्या अग्नीमध्ये होळी करून नविन तेजोमय तेजस्वी विवेक विचारांचे अंगीकार करणे होय. महाराष्ट्रामध्ये ३६ जिल्हयांपैकी सुमारे ३३ जिल्हयांमध्ये एखादं सुकं लाकूड, पेंढा, पालापाचोळा, शेणाच्या गोव–या एकत्र करून विधिवत पूजा करून अग्नी देऊन होळी हा सण मोठया आनंदात साजरा केला जातो. परंतु उत्तर कोकणामध्ये मात्र मोठमोठी महाकाय सावरीची जिवंत झाडे तोडून जाळली जातात. काही आदिवासी भागांमध्ये आंबा, जांभुळ, औदुंबर, सावर आणि इतर मिळेल ते अशी पाच जिवंत झाडे तोडून जाळली जातात. अध्यात्मामध्ये कुठल्याही ग्रंथामध्ये जिवंत झाडे तोडून जाळा असे सांगितले नाही. त्यामुळे कोकणवासी यांनी महाराष्ट्रातील इतर जिल्हयांचा आदर्श घेऊन होळी सणामध्ये होणारी हजारो जिवंत सावरीच्या झाडांची कत्तल थांबवावी आणि मोठया आनंदाने पर्यावरण पूरक होळी सण साजरा करावा असे पेण एज्युकेशनमधील प्रा.उदय मानकवळे यांनी प्रसिध्दी पत्रक देऊन आवाहन केले आहे.

आज महाराष्ट्रात १५१ तालुके दुष्काळग्रस्त आहेत. महाराष्ट्राचा बराचसा भाग दुष्काळग्रस्त वाळवंट होत चाललेला आहे. पशू, पक्षी, प्राणी पाण्यावाचून तडफडून मरत आहेत. आणि आता तर कोरोना सारखं महाभयानक संकट . आज आपल्याकडे सगळं काही आहे, पण निरोगी आरोग्य नसेल तर? अशावेळी केवळ सण उत्सवाच्या नावावर हजारो झाडांची कत्तल करून जाळणं ही फार मोठी नैसर्गिक हानी आहे. सावरीच्या झाडांवर भरपूर प्रमाणात गडद लाल रंगाची फुले येतात. त्यामध्ये भरपूर मध असते. हे मध खाण्यासाठी सुर्यपक्षी, साळुंख्या, बुलबुल, कोतवाल, चम्षेवाले, वटवटे, पोपट, हळदया व इतर पक्षांची लगबग या झाडावर मध खाण्यासाठी असते. कधीकधी तर पोपट, कावळा हे फुलांच्या पाकळयाही खाताना दिसतात. सावरीच्या झाडांची साल, काटे यांचा आयुर्वेदामध्ये औषध म्हणून उपयोग आहे. पळस, पारंगा नंतर सावर अशी झाडे रानावनात फुलतात आणि वसंत त्रुतूची चाहूल लागते. ही झाडे संपूर्ण जैवविधतेचे पक्षांचे पोट भरत असतात. आपल्याला तर हा नयनरम्य सौदर्यांचा खजिनाच असतो आणि अशावेळी ही काटेसावरीची झाडे आपण एकएक करून हजारो झाडे तोडतो. आज दुष्काळ त्यातच वणवे लागून वृक्षसंपदा नष्ट होत आहे. आणि कोरोना सारखे भयानक व्हायरस आज निसर्गामध्ये टिकून राहत आहे. संपूर्ण जग थांबवण्याची ताकद या विषाणू जिवाणूंमध्ये आहे. आज चैनीची प्रत्येक गोष्ट माणसाकडे आहे पण शुध्द हवा प्राणवायू (ऑक्सिजन) नसेल तर आपण जगणार कसे? आपल्याकडे निरोगी आरोग्य नसेल तर सर्व व्यर्थ आहे म्हणून येणा–या पिढीसाठी जंगल वनसंपदा मुबलक ठेवायची असेल तर आपण सण उत्सवांच्या नाव–ावर हौसेसाठी हजारो झाडांची कत्तल करणारे हात आता थांबवले पाहिजेत व ते हात झाडे लावण्यासाठी व जगवण्यासाठी एकवटले पाहिजेत. येणा–या पिढीसाठी आपण जंगल ही वनराई टिकवून ठेवू, नाहीतर येणारा काळ पुढच्या पिढया आपल्याला माफ करणार नाहीत. आज निसर्गाचे धक्के वारंवार आपल्याला बसत आहेत. म्हणून सृष्टीकडे बघण्याची दृष्टी बदला व पर्यावरण पुरक होळी सण साजरा करा असे आवाहन वृक्षमित्र प्रा.उदय शंकर मानकवळे यांनी होळी सणाच्या पार्श्वभुमीवर प्रसिध्द माध्यमांशी बोलताना केले आहे.



# मुबंई पुणे एक्सप्रेस वेवर खोपोली एक्झिट जवळ डिझेलचा टँकर उलटला

**दै.रायगड नगरी । खोपोली**

मुंबई पुणे एक्सप्रेस वेवर अपघाताची मालिका सुरूच असून रविवार.दि.२१मार्च रोजी रात्री ९.१५ वाजण्याच्या सुमारास खोपोली एक्झिट येथे मुंबईच्या दिशेने जाणारा एक डिझलचा टँकर उलटल्याने रस्त्यावरून इंधनाचा पाट वाहत होता.टँकर उलटल्याने टँकरचे व इंधनचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले.

रविवारी सुट्टी संपवून मुंबईकर घरी परतण्याच्या लगबगीत असताना ही घटना घडल्याने एक्सप्रेस वेवर मोठ्या प्रमाणात वाहतूककोंडी झाली होती. खोपोली एक्झिट येथील उतारावर चालकाचे टँकरवरील नियंत्रण सुटल्याने सदरचा टँकर रस्त्यामध्ये पलटी झाला. यामध्ये टँकर टाकीच्या झाकणांमधून मोठ्या प्रमाणात इंधन बाहेर पडू लागले व उतार असल्याने सर्व इंधर रस्त्यावरून पाट लागल्यासारखे वाहत असल्याचे पहायला मिळाले. या इंधनावरून वाहेन सरकून अपघात होण्याचा धोका निर्माण झाल्याने मुंबईच्या दिशेने जाणारी वाहतूक काही वेळ रोखून धरण्यात आली होती. दरम्यान क्रेनच्या सहाय्याने सदरचा टँकर बाजुला करण्यात आला असून अग्निशमनदलचे वाहनाने पाणीमारून रस्ता साफ करण्यासाठी घटनास्थळी दाखल झाली आहे.

# ज्वलनशिल टँकर झाला पलटी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

ज्वलनशिल टँकर पलटी झाल्याची घटना पनवेल जवळील पळस्पे फाटा येथे आज दुपारी घडली आहे.

ज्वलनशिल इंधनाने भरलेला टँकर पनवेल बाजूकडून गोवा मार्गाकडे पळस्पे फाटा येथे जात असताना अचानकपणे टँकर चालकाचा ताबा सुटल्याने टँकर पलटी झाला.

या घटनेची माहिती मिळताच पळस्पे वाहतूक पोलीस, अग्नीशमन दलाचा बंब व पनवेल शहर पोलीस ठाण्याचे पथक घटनास्थळी रवाना झाले व त्यांनी अत्यंत सावधगिरी बाळगत टँकर सरळ केला. या घटनेत कोणत्याही प्रकारची जिवीतहानी झाली नाही.

**MORAYA GARDEN RESIDENCY CO-OP.HSG.SOCIETY LTD.**

(Registration No: RGD/PWL/HSG/(TC)/3417/2017-18/Year-2017)
Gat No. 31/1 & other, Usarli Khurd, Post-ONGC, Panvel, Dist: Raigad-410221
Email ID-morayagarden333@gmail.com Contact No. 7208675397

**PUBLIC NOTICE**

**Vide This public Notice quotes are called from steel structure Fabricators and Galvanized pipe / Patra suppliers the vicinity of New Panvel / Panvel / Navi Mumbai. for fabrication of Terrece shed on the building in our society and forj supply of materisls for such shed as mentioned below -**

1) GI Patra shed fabrication - Labour charges per square feet
2) Suppy of GI pipe ISI Mark
   size - 2" x 2" - 2mm Thick, 1.5" x 1.5" - 2 mm Thick
   - 4" x 2" - 2 mm Thick, 2.5" x 1.5" - 2 mm Thick
3. GI Patra - 0.5 mm Thick-TATA/JINDAL make

For further details and queries please contact on following numbers.
**9594285399 / 72086 75397**

Interested parties are requested to submit their quotes in sealed envelope within 7 days of this Notice.

**Sd/-**
**Chainman/ Secretary**
**Moraya Garden Residency CHS Ltd.**
**Usarli Khurd, Panvel**

अर्जदाराचे वकील : ॲड.सलमान रशीद पटेल

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी सो. यांचे कोर्टात
फौ.चौ.अर्ज नं.३८६/२०२१
ने.ता.२६/०४/२०२१

मोहसीना बेगम बशीर अहमद पटेल
वय : ४८ वर्षे, धंदा : व्यवसाय
रा.तळोजा पाचनंद, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार
विरुद्ध
पनवेल महानगरपालिका,
विभाग–तळोजा पाचनंद — सामनेवाला

सर्व लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यात येते आहे की, अर्जदार मोहसीना बेगम बशीर अहमद पटेल यांचा दि.२१/०५/१९७३ रोजी मौजे : तळोजा पाचनंद, ता.पनवेल, जि.रायगड येथे जन्म झालेला आहे. सदरहू अर्जदार यांनी त्यांच्या जन्माच्या तारखेची नोंद होणेकरिता सदरचा अर्ज नामदार कोर्टात दाखल केलेला आहे.

सदरहू मोहसीना बेगम बशीर अहमद पटेल यांचा वर नमूद ठिकाणी जन्म झाले आहे किंवा कसे हे कोणास समजविण्याचे असेल तर किंवा सदर अर्जदारांनी दाखल केलेला अर्जाबाबत कोणत्याही कसल्याही हरकती असल्यास सदरच्या हरकती ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्यात मे.कोर्टात दाखल कराव्यात. मुदतीनंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही व सदरहू न्यायालय अर्जदार यांचेकडे सदरहू मोहसीना बेगम बशीर अहमद पटेल यांच्या जन्माची नोंद करण्याचे आदेश संबंधितांना देईल याची नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे ही जाहीर नोटीस आमच्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी आज रोजी दि.२२/०३/२०२१ रोजी दिली.

सही/– क.लिपीक फौ.न्या.क.स्तर, पनवेल | कोर्टाचा शिक्का | सही/– सहा.अधिक्षक फौ.न्या.क.स्तर, पनवेल

राव साहेब
अर्जदारातर्फे वकील श्री.हेमंत कां. मिरगुंडे

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश (व.स्तर) यांचे न्यायालयात,
ता.पनवेल, जिल्हा : रायगड
दि.चौ.अर्ज क्र.३८६/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.२२/०४/२०२१

श्री.संदीप मधुकर चौगुले
रा.अे/८०, सिडको कॉलनी, अयप्पा मंदिरासमोर,
सेक्टर १३, नवीन पनवेल, जि.रायगड — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही — सामनेवाला

ज्याअर्थी या जाहीर नोटीसीने सर्व तमाम लोकांस कळविण्यात येते की, कै.मधुकर शंकर चौगुले यांचा दि.२१/०८/२०१४ रोजी व कै.सुमती मधुकर चौगुले यांचे दि.२२/०२/२०१९ रोजी नवीन पनवेल, ता.पनवेल, जिल्हा : रायगड येथे निधन झाले. कै.मधुकर शंकर चौगुले व कै.सुमती मधुकर चौगुले यांचे अर्जदार हे कायदेशीर वारस आहेत.

अर्जदार यांच्या या हक्काबाबत कोणतीही व्यक्तीगत हरकत घ्यावयाची असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून वर नमूद मे.न्यायालयात एक महिन्याच्या आत हजर राहून आपल्या हरकती सादर करावयाच्या आहेत.

याद्वारे असे जाहीर करण्यात येते की, वर नमूद कालावधी संपण्याच्या अगोदर योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे मे.न्यायालय वरील अर्जदार यांचे हक्कांबाबत पुरावा देण्याची ताबडतोब कारवाई करील व कै.बामा पद्या केणी यांचे वारसपत्रास अर्जदार हक्कदार आहेत असे शाबीत झाल्यास त्यांना वारस दाखला मंजूर करील.

सदरची नोटीस आज दि.१८ मार्च सन २०२१ रोजी आमच्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/– क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल | कोर्टाचा शिक्का | सही/– सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल


## वाचकांना विनम्र सूचना

दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.





**Public Notice**

Notice is hereby given to the public that the agreement for Sale Dated 02/06/2016 videDocument No.PVL4/5017/2016 registered with the Sub-Registrar, Panvel-4 and deed of cancellation dated 03/08/2016 vide document No.PVL4/6867/2016 registered with the Sub -Registrar, Panvel-4 executed between my father Late Mr. Balaram Padu Patil (the Transferor) and Mr. Pankaj Yashpal Gupta through his power of attorney holder Mr. Sunil Munilal Gupta (the Purchaser) in respect of Flat No.502, C-wing 5th Floor "Mannat" Plot No.44 Sector-20 Taloja Panchnand Taluka Panvel Dist-Raigad have been lost/misplaced. In connection therewith I have registered a lost property complaint bearing registration No.0223/2021 on 19/03/2021 with the Taloja Police Station. Any persons who finds the above said documents or title documents should intimate to the undersigned & if any person, bank, financial institution having any claim or right in respect of the said Flat by way of inheritance, share, Sale, Mortgage, lease, lien, license, gift, possession or encumbrance howsoever or otherwise or having above documents in their custody is hereby called upon to intimate the undersigned within 7 days from the date of publication of this notice of his/their claim with all supporting documents.
Place: Navi Mumbai
Date: 20/03/2021

sd/-
Mr. Parshuram Balaram Patil
Inampuri, Taluka Panvel Dist-Raigad
Mo.9224227571

प्रो.जमा.६–२५ — अर्जदाराचे वकील : ॲड.ज्योत्स्ना भालेकर, ॲड.सुप्रिया भगत

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांचे न्यायालयात
क्रि.एम.ए.नं.३४३/२०२१
ने.ता.१०/०५/२०२१

श्री.अजय लक्ष्मण पाटील
वय : ५० वर्षे, धंदा : शेती
रा.उलवे, पो.उलवे, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार
विरुद्ध
ग्रामपंचायत अधिकारी / ग्रामसेवक
ग्रुप ग्रामपंचायत उलवे, ता.पनवेल, जि.रायगड — सामनेवाला

सदरचा अर्जदार हा मौजे : उलवे, पो.उलवे, ता.पनवेल, जि.रायगड येथील कायमस्वरुपी रहिवाशी आहे. अर्जदार यांचे आजोबा कै.नामदेव बुधाजी मढवी उर्फ पाटील यांचा मृत्यू दि.०७/०२/१९६७ रोजी मु.उलवे, पो.उलवे, ता.पनवेल, जि.रायगड. परंतु काही कारणास्तव अनावधानाने अर्जदार यांचे आजोबांची मृत्यूची नोंद केलेली नाही. तसेच आज रोजी अर्जदार यांचे आजोबांची मृत्यूची नोंद असलेले लेखे कुठेही नाही. तसा पंचायत समितीने व ग्रुप ग्रामपंचायत उलवे, ता.पनवेल, जि.रायगड मधून अर्जदार यांचे आजोबांची मृत्यूची नोंद नसल्याचा दाखला देण्यात आलेला आहे.

सबब, अर्जदार यांनी सदरचा जन्म मृत्यू नोंदणी कायदा १९६९ कलम १३ (३) प्रमाणे मे.कोर्टात क्रिमिनल एम.ए.नं.३४३/२०२१ दाखल केला आहे. सबब सदरचा जन्म मृत्यू नोंदणीबाबत कै.नामदेव बुधाजी मढवी उर्फ पाटील, मृत्यू दि.०७/०२/१९६७ बाबत कोणाही इसमाच्या कोणत्याही हरकती असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसांचे आत या न्यायालयात सादर कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास कोणत्याही हरकती नाहीत असे समजून अर्जदार यांचे आजोबांची दि.०७/०२/१९६७ मृत्यू नोंदीबाबत सर्टिफिकेट मे.कोर्टातून देण्यात येईल व मागाहून येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज तीख २२/०३/२०२१ रोजी माझे सहीनिशी व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिली.

सही/– क.लिपीक फौ.न्या.क.स्तर, पनवेल | कोर्टाचा शिक्का | सही/– सहा.अधिक्षक फौ.न्या.क.स्तर, पनवेल

मा.पोळ साहेब
प्रो.जमा.६–२५ — अर्जदाराचे वकील : ॲड.दिनेश पाटील

**जाहीर नोटीस**

उरण येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी साहेब यांचे न्यायालयात
क्रि.एम.ए.नं.६५/२०२१
ने.ता.२६/०४/२०२१

१) श्री.हेमंत बाळाराम पाटील
वय : ३२ वर्षे, धंदा : नोकरी
रा.शिवकर, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार
विरुद्ध
ग्रामपंचायत अधिकारी / ग्रामसेवक
ग्रुप ग्रामपंचायत चिर्ले,
ता.उरण, जि.रायगड — सामनेवाला

सदरचा अर्जदार हा मौजे : शिवकर, ता.पनवेल, जि.रायगड येथील कायमस्वरुपी रहिवाशी आहे. अर्जदार यांचे पणजोबा कै.कमळू हनुमंत घरत यांचा मृत्यू दि.०४/०४/१९४८ रोजी मौजे : चिर्ले, ता.उरण, जि.रायगड येथे राहत्या घरी झालेला आहे. परंतु काही कारणास्तव अनावधानाने अर्जदार यांचे पणजोबांची मृत्यूची नोंद केलेली नाही. तसेच आज रोजी अर्जदार यांचे पणजोबांची मृत्यूची नोंद असलेले लेखे कुठेही नाही. तसा पंचायत समितीने व ग्रुप ग्रामपंचायत चिर्ले, ता.पनवेल, जि.रायगड मधून अर्जदार यांचे पणजोबांची मृत्यूची नोंद नसल्याचा दाखला देण्यात आलेला आहे.

सबब अर्जदार यांनी सदरचा जन्म मृत्यू नोंदणी कायदा १९६९ कलम १३ (३) प्रमाणे मे.कोर्टात क्रिमिनल एम.ए.नं.६५/२०२१ दाखल केला आहे. सबब सदरचा जन्म मृत्यू नोंदणीबाबत कै.कमळू हनुमंत घरत मृत्यू दि.०४/०४/१९४८ बाबत कोणाही इसमाच्या कोणत्याही हरकती असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसांचे आत या न्यायालयात सदर कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास कोणत्याही हरकती नाहीत असे समजून अर्जदार यांचे पणजोबांची दि.०४/०४/१९४८ मृत्यू नोंदीबाबत सर्टीफिकेट मे.कोर्टातून देण्यात येईल व मागाहून येणाऱ्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही.

आज तारीख २२/०३/२०२१ रोजी माझे सहीनिशी व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिली.

कोर्टाचा शिक्का | सही/– सहा.अधिक्षक फौ.न्याया.क.स्तर, उरण

पृष्ठ क्र.१ वरुन...

## कोरोना लसीचा पहिला डोस

संकटकाळात आधार देण्यात आला. १ लाखाहून अधिक नागरिकांना मास्क व रोगप्रतिकारक शक्ती वाढविणाऱ्या गोळ्या, रक्ताचा तुटवडा भरून काढण्यासाठी रक्तदान शिबीर, परगावी जाण्यासाठी सुविधा अशी अनेक प्रकारची मदत आमदार प्रशांत ठाकूर यांनी केली. त्यांनी या काळात केलेली मदत खऱ्या अर्थाने सर्वसामान्यांना आधार आणि समाजात प्रेरणा देणारी ठरली असून सतत सामाजिक बांधिलकी जपणारे आमदार प्रशांत ठाकूर यांनी आज कोरोना लसीचा पहिला डोस घेतला आहे.

## श्रीवर्धन शहरात चोरट्यांचा पुन्हा एकदा धुमाकूळ

माहिती असल्याप्रमाणेच चोऱ्या केल्या आहेत. त्यामुळे या चोरी मध्ये कोणी स्थानिक गुन्हेगार आहे की काय? अशी शंका पोलिसां समोर निर्माण होत आहे.

श्रीवर्धन शहरातील प्रभु आळी, पेशवे आळी व साळीवाडा या परिसरात या चोऱ्या घडलेल्या आहेत. मात्र हा परिसर अत्यंत गजबजलेला परिसर असून याठिकाणची घरे खूप जवळजवळ आहेत. तरीसुद्धा चोरट्यांनी या ठिकाणी चोरी करण्याचे धाडस दाखविले आहे. २०१७ साली झालेल्या चोरी प्रकरणी पुण्याजवळील पौड येथून एका अट्टल गुन्हेगाराला पोलिसांनी अटक केली होती. मात्र या वेळच्या चोरीच्या गुन्ह्यांमध्ये पोलिसांसमोर गुन्हेगारांना अटक करणे मोठे आव्हान ठरणार आहे. शहरातील अजित कुळकर्णी, पराग कुळकर्णी, भूषण महाडकर, अनिता ताम्हणे, व निषाद विरकुड यांची घरे चोरट्यांनी रात्री फोडली, तर नितीन गजानन करडे यांचे घर फोडून जवळजवळ ७१ हजार रुपयांचा सोन्याच्या दागिन्यांचा ऐवज चोरट्यांनी लंपास केला आहे. करडे कुटुंबीय श्रीवर्धन येथे नसल्याचे चोरट्यांनी बरोब्बर हेरून त्यांच्या घरावरती डल्ला मारण्याचे साधले आहे. या अगोदर देखील श्रीवर्धन शहरामध्ये अनेक वेळा चोर्या झाल्या व अनेक हजाराचा ऐवज लंपास झाला. परंतु या चोऱ्याचा छडा लावण्यात पोलिसांना पूर्णपणे अपयश आले होते. श्रीवर्धन तालुक्यात गुन्ह्यांची संख्या अतिशय कमी असल्याने श्रीवर्धन पोलीस ठाण्यात नेमणुकीस असलेल्या कर्मचारी वर्गापेक्षा पन्नास टक्केच कर्मचारी नेमले जातात. त्यामुळे दिवसभर पोलिसांची असणारी इतर कामे व रात्रीची गस्त यामध्ये पोलिसांना पोलीस कमी पडतात. त्यामुळे श्रीवर्धन मधील नागरिकांना चोऱ्या झाल्यानंतर आपल्या कमवलेल्या कष्टाच्या पैशांचे व सोन्याचे विनाकारण नुकसान सहन करावे लागते.

याचे सुखदुःख कोणालाही नसते. तरी रायगडच्या पोलीस अधीक्षकांनी श्रीवर्धन येथे नेमणुकीस असलेला पूर्ण कर्मचारी वर्ग श्रीवर्धन पोलीस ठाण्यात तातडीने भरावा अशी मागणी श्रीवर्धन शहरातील नागरिकांमधून केली जात आहे. सहा घरफोड्यांच्या झालेल्या घटनां पैकी नितीन गजानन करडे यांनी श्रीवर्धन पोलीस ठाण्यात फिर्याद दिली असून श्रीवर्धन पोलिसांनी गुन्हा रजिस्टर क्रमांक ९ / २०२१ भा.द.वि. कलम ३८०, ४५४, ४५७ अन्वये गुन्हा दाखल केला आहे. या गुन्ह्याचा अधिक तपास पोलीस निरीक्षक प्रमोद बाबर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक खिरड हे करीत आहेत.

श्रीवर्धन शहरातील नागरिकांकडून या चोरीच्या घटनेबाबत संतप्त प्रतिक्रिया उमटत असून श्रीवर्धन पोलीस ठाण्यात जिल्हा पोलीस अधीक्षक यांच्या कडुन नेहमीच कमी कर्मचारी नेमण्यात येतात. चोरी झाल्यानंतर नुकसान नेहमीच सामान्य माणसाला सोसावे लागते. श्रीवर्धन पोलीस ठाण्यात अधिकारी वर्गापेक्षा कर्मचाऱ्यांची आवश्यकता जास्त आहे. या चोरीच्या घटनांचा तपास न लागल्यास नागरिकांना श्रीवर्धन शहरात आंदोलन करण्याशिवाय पर्याय राहणार नाही. असा इशारा शहरातील नागरिकांकडुन देण्यात आला आहे.

## महासभेत पीपीई किट घालून आंदोलन

अधिकारीवर्ग ऑनलाइन पद्धतीने महासभेत सहभागी झाले होते. असे असताना महाविकास आघाडीच्या नगरसेवकांनी महासभेत येऊन आंदोलन केल्यामुळे महापौर कविता चौतमोल यांनी आंदोलकांना बाहेर जाण्याची विनंती केली अन्यथा महासभा सुरू होणार नाही. तसेच नियमांचा भंग केल्याप्रकरणी कारवाई करण्यात येईल अशी सूचना देखील आंदोलकांना दिली. मात्र मालमत्ता करासंदर्भात सत्ताधाऱ्यांनी सर्वप्रथम भूमिका स्पष्ट करावी त्याशिवाय आम्ही सभागृहाच्या बाहेर जाणार नाही असा आक्रमक पवित्रा महाविकास आघाडीच्या नगरसेवकांनी घेतला. तसेच जनतेच्या हितासाठी आमच्यावर निलंबनाची कारवाई होणार असेल तर त्याची देखील फिकीर नाही, आम्ही कारवाईसाठी तयार आहोत. असा आक्रमक पवित्रा महाविकास आघाडीच्या नगरसेवकांनी घेत घोषणाबाजी करत सभागृहात गदारोळ सुरूच ठेवला. अखेर येत्या सात दिवसात मालमत्ता करासंदर्भात विशेष सभा बोलण्यात येईल असे महापौर कविता चौतमोल यांनी आंदोलकांना सांगितल्यानंतर आंदोलक महासभेच्या सभागृहातुन बाहेर निघाले. परंतु येत्या सात दिवसांत यासंदर्भात सभा घेण्यात आली नाही तर यापुढे आम्ही कोणत्याही सभेत उपस्थित राहणार नाही. तसेच याविरोधात पालकमंत्री आदिती तटकरे, एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री अजित पवार यांची भेट घेणार असल्याचा निर्णय विरोधी पक्षातील सदस्यांनी घेतला आहे. सध्या कोरोनाचा प्रादुर्भाव दिवसेंदिवस वाढत चालला असून आमच्यामुळे कोणाला त्रास होऊ नये यासाठी आम्ही सर्व महाविकास आघाडीचे नगरसेवक पीपीई किट घालून याठिकाणी आलो आहोत. कोरोनामुळे आम्ही या गोष्टीची खबरदारी घेतो परंतु महापालिका वाढत्या कोरोनावाढीला गांभीर्याने घेत नसल्याचे दिसून येत आहे. नाट्यगृहात आम्ही आलो असता याठिकाणी साफसफाई दिसून येत नाही, आमचे तापमान तपासले नाही, सॅनिटायझेशन केले नाही त्यामुळे महापालिका कोरोनाबाबत गांभीर्याने पाहत नाही म्हणून आम्ही आंदोलनासाठी पीपीई किट घालून आलो असे आंदोलकांनी सांगितले.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू–२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई–४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल–४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स–२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा–पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# उरण महावितरण कार्यालयमध्ये स्वच्छता अभियानाचा उडाला फज्जा

**दै.रायगड नगरी । अनंत नारंगीकर**

**जेएनपीटी** : उरण महावितरण कार्यालयातील अधिकारी वर्गाने शासनाच्या स्वच्छता भारत अभियानाला हारताळ फासल्याने महावितरण कार्यालयात, परिसरात सध्या घाणीच्या साम्राज्या बरोबर दारुच्या बाटल्या पडल्याचे भयानक चित्र पाहावयास मिळत आहे.त्यामुळे राज्य सरकारच्या महावितरण कार्यालयातच स्वच्छता मोहिमेला डाग लागल्याचे चित्र उरण क्षेत्रात दिसून येत आहे.



केंद्र व राज्य सरकारच्या आदेशान‍ुसार शहरात, ग्रामीण खेड्यात, ठिक ठिकाणच्या प्रकल्पात तसेच शासकीय कार्यालयात स्वच्छता भारत अभियान कार्यक्रम राबविण्यात येत आहे.अशा स्वच्छता अभियानासाठी लाखो रुपये खर्च केले जात आहेत. परंतु उरण महावितरण कार्यालयातील अधिकारी कर्मचारी वर्गाला सरकार राबवीत असलेल्या स्वच्छता अभियानाचा विसर पडत असल्याने महावितरण कार्यालयात, परिसरात मोठ्या प्रमाणात गवत,झाडे झुडपे वाढून घाणीच्या साम्राज्या निर्माण झाले आहे. त्यात महावितरण कार्यालयाच्या आवारात दारुच्या बाटल्या पडल्याचे भयानक चित्र ही पाहावयास मिळत असून सरपटणाऱ्या प्राण्यांचा वावर सुरू झाला आहे.

एकंदरीत तालुक्यातील नागरीक,ग्राहक महावितरण संदर्भातील तक्रारीचे निवारण करण्यासाठी,आपले विज बिल भरण्यासाठी दरदिवशी कार्यालयात ये- जा करत आहेत.



त्यामुळे काही नागरीक आपल्या जवळील रिकाम्या पाण्याच्या बाटल्या कार्यालयात परिसरात टाकत आहेत.मात्र अधिकारी वर्गाने दुर्लक्ष केल्याने काही कार्यालयातील तेलीराम हे ही रिकाम्या झालेल्या दारुच्या बाटल्या कार्यालयातील परिसरात टाकताना भयानक चित्र दिसून येत आहे. तरी महावितरण कार्यालयात मद्यपान करण्यास मनाई आहे असे फलक लाऊन कार्यालयात कचराकुंडी ठेवणे गरजेचे आहे.तसेच कार्यालयातील, परिसरातील गवत झाडे झुडपे काढून स्वच्छता मोहिम राबविण्यासाठी कार्यालयाचे उप अभियंता हरिदास चौंडे यांनी पुढाकार घेणे गरजेचे आहे.अशी मागणी नागरीक करत आहेत.

यासंदर्भात उरण महावितरण कार्यालयाचे उप अभियंता हरिदास चौंडे यांना विचारणा केली असता त्यांनी माहिती देताना सांगितले की २६ जानेवारी रोजी कार्यालयात स्वच्छता अभियान राबविण्यात आले .त्यानंतर पुन्हा काही दिवसाने स्वच्छता करण्यात आली. परंतु कार्यालयातील जागा ही उरण नगर पालिका आणि चाणजे ग्रुप ग्रामपंचायत हद्दीत येत असल्याने त्यांच्या तू- तू- मैं मैं मुळे कार्यालयातीच्या प्रवेशद्वाराजवळ गटाराचे पाणी,घाण दिसत आहे.

# गृहमंत्र्यांच्या राजिनामासाठी तळा भाजपाच्या वतीने मुख्यमंत्र्यांना निवेदन

**दै.रायगड नगरी । संजय रिकामे**

**तळा** : मुंबई पोलीस आयुक्तपदावरुन उचलबांगडी केलेले पोलीस अधिकारी परमबीर सिंग यांनी गृहमंत्री अनिल देशमुख यांच्यावर गंभीर आरोप केला आहे. अनिल देशमुख यांनी प्रत्येक महिन्याला १०० कोटी रुपयांची वसुली करण्याचं टार्गेट सचिन वाझे यांना दिलं होतं, असा खळबळजनक दावा परमबीर सिंग यांनी केला आहे. परमबीर सिंग यांनी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना याबाबत पत्र लिहिलं आणि महाराष्ट्रासह देशात एकच खळबळ माजली.

राज्याचे गृहमंत्री अनिल देशमुख यांनी राजिनामा द्यावा यासाठी तळा भाजपाच्या वतीने मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना रायगड जिल्हा पोलीस यांच्या मार्फत निवेदन तळा भाजपाच्या वतीने दि.२१/३/२१ रोजी देण्यात आले. मुंबईचे माजी पोलीस आयुक्त परमबीर सिंग यांनी लिहिलेले पत्र खळबळजनक नाही तर धक्कादायक आहे. परमबीर सिंग यांनी पत्रात जोडलेले चॅट हा गंभीर पुरावा आहे. महाराष्ट्राच्या पोलीस विभागात धक्कादायक प्रकरण उघडकीस येत आहेत. पोलीस दलाच खच्चीकरण होताना दिसत आहे. गृहमंत्री आपल्या पदावर राहु शकत नाहीत. गृहमंत्र्यांनी तात्काळ राजिनामा दिला पाहीजे किंवा मुख्यमंत्र्यांनी राजिनामा घ्यावा अशी मागणी यावेळी तळा तालुका भाजपा अध्यक्ष कैलास पायगुडे यांनी केली. यावेळी तालुका अध्यक्ष कैलास पायगुडे, शहर अध्यक्ष सुधीर तळकर, सरचिटणीस श्री. लोखंडे, रितेश मुंढे, गीतेश मेकडे, हर्षद ठक्कर, श्री.पाशिलकर आदि मान्यवर उपस्थित होते.


**महाराष्ट्र जीवन प्राधिकरण**

**ई-निविदा सूचना क्र.४, सन २०२०-२१**

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, वाढीव उद्धव शहापाडा प्रादेशिक पाणी पुरवठा योजना, ता.पेण, जि.रायगड (पूर्ण ठेव योजना) या कामाच्या उर्वरित कामासाठी अंदाजित किंमत रु.९,४५,४०.६१५/- करिता ई-निविदा मागविण्यात येत आहेत. कामासंबंधीचा सविस्तर तपशिल दि.२२/०३/२०२१ पासून www.mahatenders.gov.in व www.mjp.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

दि.१९/०३/२०२१

**सही/-**
**(एस.बी.कुलकर्णी)**
**कार्यकारी अभियंता (प्रभारी)**
